# विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/दि.म.- ८६/ **१९१** /२०२६ दि.०९/१०/२०२६

## दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव २०२६

प्रति,
**मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांना -**

**विषय :-विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव २०२६ बाबत....**
**संदर्भ:-** जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि/आमयुम-३३/१८६/२०२६, दि. ०८.१०.२०२६

महोदय / महोदया,

विद्यापीठ प्राधिकरण धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांच्या व्यक्तिगत सुप्त कला गुणांचा विकास व्हावा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रतिभावंत-कलावंत घडावेत, यासाठी दिव्यांग कला महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

विद्यार्थी विकास मंडळाच्या दि. २२ जून, २०२६ रोजीच्या प्रथमसभेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव मागील वर्षा प्रमाणेच ज्या ठिकाणी युवक महोत्सव युवारंगचे आयोजन होईल त्याच ठिकाणी दिव्यांग कला महोत्सव घेण्यात यावा असे ठरलेले आहे.

आपणास विदीतच आहे की, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग- २०२६ चे आयोजन **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** येथे **दि. २७ ते ३१ ऑक्टोंबर, २०२६** या कालावधीत करण्यात येत आहे. याच महोत्सवात **दिव्यांग कला महोत्सव** वरील कालावधीत घेण्यात येणार आहे.

विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवात वक्तृत्व, स्थळचित्र, व्यंगचित्र, मातीकला, भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत एकल (स्वरवाद्य), भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत एकल (तालवाद्य), भारतीय शास्त्रीय गायन-एकल, भारतीय सुगम संगीत-एकल इत्यादी कलाप्रकारांचा समावेश असेल. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांना सदरची बाब लक्षात आणून देवून महोत्सवात सहभागी होण्यास प्रेरीत करावे. सहभागी होणा-या दिव्यांग विद्यार्थी संघासोबत गरजेनुसार मदतनीस यांना पाठवावे. आयोजन स्थळी सहभागी व मदतनिस यांची भोजन व्यवस्था नि:शुल्क करण्यात आलेली आहे. सहभागी होणा-या दिव्यांग विद्यार्थी व मदतनिस याची माहिती sw@nmu.ac.in या मेलवर दि. २२ ऑक्टोबर, २०२६ पावेतो पाठवावी व हार्ड कॉपी महोत्सवाच्या दिवशी दि. २७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी १२.०० वाजेपर्यत नोंदणी कक्षात सादर करावी.

आपला विश्वासू,

(प्रा. डॉ.प्रविण न. महाले)
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत :-** सोबत महोत्सवाच्या अटी, शर्ती व प्रवेश अर्ज

**प्रत माहितीसाठी -**

११) डॉ. संजय काशिनाथ  पाटील, जिल्हा समन्वयक, जळगाव जिल्हा, पंकज महाविद्यालय, चोपडा
१२) डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण, जिल्हा समन्वयक, धुळे जिल्हा, एस.पी.डी.एम.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर
१३) डॉ. विजयप्रकाश ओमप्रकाश शर्मा, जिल्हा समन्वयक, नंदुरबार जिल्हा, पी.एस.जी.व्ही.पी.एस.चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा
१४)डॉ. सचिन पंडीत गाडेकर, विद्यापीठक्षेत्र समन्वयक, रसायनशास्त्र प्रशाळा., कबचौउमवि, जळगाव
१५) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
१६) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
१७)विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
१८) विभागप्रमुख, कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
१९) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया वृत्तपत्रात प्रसिध्दी दयावी.
२०) मा.पध्दती विश्लेषक संगणक केंद्र, संगणक प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

Shivade/yuvak mahotsav  2026-27

## ♦ विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव २०२६ नियमावली ♦

*** महाविद्यालय, परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना महत्वाच्या सूचना :-**

१) सहभागी दिव्यांग विद्यार्थ्यांनी नोंदणी करतांना **जिल्हा शल्य चिकित्सक** यांचे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२) दिव्यांग विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ३ कलाप्रकारात सहभागी होता येईल.

३) दिव्यांग कला महोत्सवात प्रत्येक कलाप्रकारासाठी किमान तीन स्पर्धक आवश्यक राहतील. त्यापेक्षा कमी स्पर्धक असल्यास ती स्पर्धा रद्द करण्यात येईल.

४) प्रत्येक महाविद्यालयाच्या संघासोबत आवश्यकतेनुसार मदतनीस पाठविणे. त्यांचा प्रवासखर्च त्या-त्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था / प्रशाळा-विभाग यांनी करावा.

५) दिव्यांग विद्यार्थी व मदतनीस यांना महोत्सवातील **प्रवेश निशुल्क राहील.**

६) कोणत्याही कला प्रकारासाठी वादन साहित्य, साथसंगतदार व इतर साहित्य, स्पर्धकाने सोबत आणावे. यासाठी महाविद्यालय युवक महोत्सव युवारंगात सहभाग घेणा-या साथसंगतदारांचा उपयोग करु शकेल. परंतू वेगळे साथसंगतदार असल्यास भोजन (दुपार व रात्रीची) व्यवस्थेकरीता प्रती व्यक्ती रु. ८००/- शुल्क आकारण्यात येईल, सदर शुल्क NEFT द्वारे यजमानांकडे जमा करावे व त्याची पावती प्रवेश अर्जासोबत जोडावी.

७) महोत्सवात सहभागी होणाऱ्या संघाची कला प्रकार निहाय नोंदणी परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे करावी. उशिरा आलेल्या संघाची नोंदणी करण्यात येणार नाही, याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.

८) महोत्सवासाठी दिव्यांग विद्यार्थी / विद्यार्थीनीची निवड करतांना सदरचा विद्यार्थी पदवी / पदवीव्युत्तर वर्गात नियमित प्रवेश घेणारा असावा. त्यांचेकडे **शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील ओळखपत्र असावे त्यावर मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल याची स्वाक्षरी असावी.**

९) सदरच्या स्पर्धा आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग- २०२६ च्या वेळापत्रकाप्रमाणेच घेण्यात येतील. स्पर्धकाने निश्चित केलेल्या क्रमवारीनुसार सादरीकरण करणे बंधनकारक राहील.

१०) संघ व्यवस्थापकांच्या सभेत वक्तृत्व स्पर्धेचा विषय आदल्या दिवशी देण्यात येईल.

११) **कला प्रकार सादरीकरणामध्ये अश्लिल शब्दाचा वापर करु नये.**

**१२) कला प्रकार सादरीकरणामध्ये धर्म, जाती, देवी-देवता, आस्थेची प्रतिके, महान व्यक्ती यांचा अवमान करणारे शब्द किंवा अश्लिल शब्दाचा वापर करु नये. तसे आढळल्यास त्या कला प्रकाराचे सादरीकरण त्याच क्षणी रद्द करण्याचा अधिकार परीक्षकांना व विद्यापीठ प्राधिकरणास आहे.**

१३) विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सवात सहभागीनां सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

१४) महोत्सव संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार महोत्सव आयोजन समितीने राखून ठेवला आहे.

(प्रा. डॉ. प्रविण न. महाले)
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

---

## विद्यापीठस्तरीय दिव्यांग विद्यार्थी कला महोत्सव २०२६-२७

## प्रवेश अर्ज

१. विद्यार्थी / विद्यार्थीनीचे नांव :- ____________________________________________

२. वर्ग :- ______________________________________

३. जन्म तारीख :- _______________________________

४. भ्रमणध्वनी क्रमांक :- ____________________________

५. ईमेल आयडी :- ______________________________

६. महाविद्यालयाचे नांव :- _____________________________________________________

_________________________________________________________

७. खालीलपैकी कोणकोणत्या कला प्रकारात सहभागी व्हायचे आहे, त्यानुसार चौकोनात √ खूण करावी. (जास्तीत जास्त ३ कलाप्रकार)

वक्तृत्व ☐ स्थळचित्र ☐ व्यंगचित्र ☐ मातीकला ☐

भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत (स्वरवाद्य) ☐ भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत (तालवाद्य) ☐

भारतीय शास्त्रीय गायन-एकल ☐ भारतीय सुगम संगीत-एकल ☐

८. आपण युवक महोत्सव युवारंग- २०२६ मध्ये इतर कला प्रकारात सहभागी झाला आहात काय ? असल्यास कलाप्रकाराचे नावे नमूद करावे.

१.______________________________ २.______________________

३.______________________________

९. मी _________________________________________ वर्ग ____________ प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, सदर कला महोत्सवात मी ज्या कला प्रकारात सहभाग घेतला आहे, त्या साहित्याची निर्मीती माझी स्वतःची असून इतर कोणाचेही वाङमय चौर्य नाही याची मला खात्री आहे. यासंबधी खोटा प्रकार आढळल्यास मी स्वतः जबाबदार राहील.

आपला / आपली विश्वासू,

(विद्यार्थी / विद्यार्थीनीची स्वाक्षरी)

**सोबतः-** १) मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांचे दिव्यांग प्रमाणपत्राची छायांकित प्रत.
२) जन्मतारखेचा दाखल्याची छायांकित प्रत. ३) महाविद्यालयाचे ओळखपत्राची छायांकित प्रत.

प्राचार्य
सही व शिक्का